**प्रेसनोट** दि. 29/05/2026

**अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून अपर तहसिल कार्यालय, लोणीकाळभोर येथील ग्राम महसुल अधिकारी यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | लोणी काळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरूष वय 38 वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.अक्षय शिवाजी कोल्हे वय 28 वर्षे पद- ग्राम महसुल अधिकारी नेमणूक अप्पर तहसील कार्यालय लोणी काळभोर पुणे. रा.ठी.रूम नंबर 811, Tudros Heights, कोद्रे नगर शेवाळवाडी पुणे. |
| सुरवातीची लाच मागणी | 2,00,000/- (दोन लाख रूपये) |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी | 1,00,000/- (एक लाख रूपये) |
| पडताळणी दिनांक | दि. 02/04/2026 रोजी |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्री. सुहास हट्टेकर , पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र.9881873330) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती आसावरी शेडगे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि,पुणे (मो.क्र. 8425808058) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांचा जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय असून त्यांनी मौजे हिंगणगाव ता. हवेली येथील शेतजमीन सपाटीकरण, विहीर खोदकाम व पाईपलाईनची परवानगी मिळावी याकरीता अप्पर तहसीलदार लोणी काळभोर यांच्याकडे अर्ज केला होता. लोकसेवक श्री. अक्षय कोल्हे हे अपर तहसीलदार कार्यालयामध्ये ग्राम महसूल अधिकारी म्हणून काम करत आहेत. तक्रारदाराने मागितलेल्या परवानगी संदर्भाने ते तक्रारदाराकडे रू. 2,00,000/- रूपये लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दिनांक 01/04/2026 रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे तक्रार दिली आहे.

तक्रारदाराच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. 02/04/2026 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता यातील लोकसेवक श्री कोल्हे यांनी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदाराकडे त्याने मागितलेल्या परवानगी अर्जावर अपर तहसीलदार लोणी काळभोर यांच्याकडून कार्यवाही करून देतो या कारणासाठी तडजोडीअंती रू. 1,00,000 (एक लाख रूपये) लाच मागितल्याचे निष्पन्न झाले आहे.

यातील आरोपी लोकसेवक श्री. अक्षय कोल्हे यांचेविरूद्ध लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.223/2026 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 नुसार दि. 29/04/2026 रोजी गुन्हा दाखल केला आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) **व्हॉट्स-अॅप क्रमांक -** 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट -** www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन अॅप तक्रार -** www.acbmaharashtra.net.in

29/5/26
दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner